संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्र. ४३०/२०१७

**निशाणी क्र. ५**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ३ यांची जबानी**
Deposition of Witness No. for the

*मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,*
I do hereby on solemn affirmation state that--

**माझे नाव : सौ. सिमा अनिलरावजी गांगडे,**
My name Father's name
**धर्म**
Religion
**वय सुमारे : ३५ वर्षे** **व्यवसाय : घरकाम,**
Age about Years Occupation
**निवासस्थान : ईस्माईल ले आउट, ब्राम्हणी, कळमेश्वर, जि. नागपूर.**
Residence District

---------------

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे श्री. एस.एस. सावलकर सरकारी अभियोक्ता</u>**

१. आरोपी प्रकाश याला मी ओळखते. तो माझे घरामागे राहतो. दिनांक ०२.०६.२०१७ रोजी, सायंकाळी ८.०० वाजता आमचे ले आउट मधील हनुमान मंदिर समोरील खुल्या जागेत मिटींग बोलाविली होती. मिटींगला बोलविण्यासाठी श्रीमती चरपे बाई आली होती. चरपे बाईंना मी मिटींग कशाबाबत आहे याबाबत विचारले होते. त्यावर त्या बाईने मला असे सांगितले की, मिटींगला हजर राहा त्या ठिकाणी आम्ही तेथे सांगु.

२ त्या दिवशी रात्री ७.४५ वाजता मिटींग ठरलेल्या ठिकाणी आम्ही जमा झालो होतो. माझे शेजारी राहणा—या बाईचे आणि आरोपीचे काही तरी बोलणे झाले. ते बोलणे झाल्यानंतर आरोपीने मारोती मंदिर पाडले. आरोपी प्रकाशचे वडीलांनी हनुमानाची मुर्ती उचलुन ठेवली. त्यानंतर आरोपी प्रकाश त्याचे घरी पळून गेला. त्यानंतर आम्ही बारा ते तेरा महिला कळमेश्वर पोलीस ठाण्यात गेलो. पोलीसांनी या घटनेबाबत माझा जबाब नोंदविला होता.

**<u>उलटतपास बचाव पक्षातर्फे ॲड. सौ. ए. आर. यासतवार.</u>**

३. आम्ही बाया तेथे बोलत बसलो होतो. त्यामुळे मंदिराजवळ काय घडले हे मी पाहिले नव्हते. चरपे बाईंना मी मिटींग कशाबाबत आहे याबाबत विचारले होते. हे मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितले होते. आरोपी प्रकाश हा मुर्ती पाडुन घरी पळाला हे मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितले होते. पोलीसांनी हे माझे जबाबात का नमुद केले नाही याचे कारण मी सांगु शकत नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझा जबाब माझे सांगण्याप्रमाणे नोंदविलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

५. उलटतपास संपला.

६. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

स्वाक्षरीत/—

**(दे.द. सुर्यवंशी)**

दिनांक : ०३.०९.२०१८. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कळमेश्वर.